# नागपूर महानगरपालिका, नागपूर
## शिक्षण विभाग

दुरध्वनी क्र. 0712–2567028
सिव्हील कार्यालय,नागपूर
Email ID : education.nmc@gmail.com

जा.क्र. शि.वि./948/2013
दि. 3/9/2013

**प्रति,**

सर्व मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
सर्व प्राथ./उच्च प्राथ./माध्य. शाळा,
महानगरपालिका, नागपूर.

**विषय :– स्वाईन फ्ल्यू संदर्भात योग्य त्या प्रतिबंधात्मक व नियंत्रणात्मक उपाययोजना शालेय स्तरावर राबविण्याबाबत.**

**संदर्भ :– 1 ) जा. क्र. ससआसे/कक्ष 58/राज्य स्वाईन फ्ल्यू/उपाययोजना/2013 दि. 14/08/2013.**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, सध्या राज्यात स्वाईन फ्ल्यू रूग्णांचे प्रमाण वाढतांना दिसत आहे. पावसाळा आणि विविध सामाजिक व धार्मिक उत्सव यांच्या पार्श्वभुमीवर स्वाईन फ्ल्यू प्रतिबंध व नियत्रंणासाठी सर्व स्तरावर आवश्यक त्या उपाययोजना राबविणे गरजेचे आहे. स्वाईन फ्ल्यू चा प्रसार शालेय मुलांमध्ये अधिक वेगाने होतो. हे आपण गेल्या काही वर्षात अनेकवेळा अनुभवले आहे. शालेय विद्यार्थ्यांमध्ये स्वाईन फ्ल्यूचा प्रसार रोखण्यासाठी खालील मार्गदर्शक सुचनांचे तंतोतंत पालन करावे.

1) ज्या उपक्रमात/कार्यक्रमात विद्यार्थी मोठया प्रमाणात एकत्र येतील असे उपक्रम शक्यतो टाळावेत. यामुळे संसंर्गाचा प्रसार रोखण्यास मदत होईल.

2) सर्व वर्ग शिक्षकांनी वर्ग सुरू करण्यापूर्वी त्यांच्या वर्गातील विद्यार्थ्यांपैकी कोणी फ्ल्यूच्या लक्षणांनी ग्रस्त नाही ना याची काटेकोरपणे पाहणी करावी. यामध्ये सर्दीसह अन्य ज्वर, अंगदूखीसह किंवा अंगदुखी शिवाय घसा खवखवणे, डोकेदुखी, उलटया व जुलाब याससारख्या लक्षणांचा समावेश आहे. जर असा विद्यार्थी आढळल्यास त्याला/तिला त्वरीत वैद्यकीय विभागाकडे पाठवावे. हया विद्यार्थ्यास/विद्यार्थीनीस 3 दिवस घरी राहण्याचा व जनसंपर्क टाळण्याचा सल्ला दयावा.. पालकांनी त्याच्या घरामधील इतर मुलांना फ्ल्यू सदृष्य लक्षणे दिसत असल्यास त्यांनाही घरीच ठेवणे आवश्यक आहे. मुलांच्या प्रकृतीवर बारकाईने लक्ष ठेवावे. लक्षणांची तीव्रता वाढल्यास अथवा प्रकृतीत बिघाड आढळून आल्यास त्वरीत वैद्यकीय विभागास कळवावे.

3) विद्यार्थी, शिक्षक, आणि शाळेमध्ये/शैक्षणिक संस्थेमध्ये काम करणाऱ्या शिक्षक व इतर कर्मचाऱ्यांमध्ये फ्ल्यू सदृष्य लक्षणे आढळल्यास त्यांना देखील घरी राहण्याचा सल्ला देण्यात यावा. त्यांनी आवश्यक ते वैद्यकीय उपचार घ्यावेत आणि शक्यतोवर जनसंपर्क टाळावा.

4) ज्या विद्यार्थी, शिक्षक आणि इतर कर्मचाऱ्यांना वैद्यकीय अधिकारी यांनी 7 दिवस घरी राहण्याचा सल्ला दिला आहे. त्यांनी वैद्यकीय देखरेखी खाली उपचार घ्यावेत तसेच जनसंपर्क टाळावा. लक्षणे बळावल्यास वैद्यकीय विभागास तात्काळ कळविण्यात यावे.

5) विद्यार्थी, शिक्षक आणि शैक्षणिक संस्थेमध्ये/शाळेमध्ये काम करणारे कर्मचारी यांनी वारंवार आपले हात साबणाने व पाण्याने स्वच्छ धूवावेत.

6) शाळेतील सर्वांनी खोकतांना/शिंकतांना आरोग्यदायी शिष्टाचार पाळावेत. विद्यार्थी, शिक्षक आणि शाळेमध्ये तसेच शैक्षणिक संस्थेमध्ये काम करणारे कर्मचारी यांनी खोकतांना/शिंकतांना तोंडासमोर टिश्यू पेपर/हातरूमाल धरावा. वापरलेला टिश्यू पेपर स्वतंत्र प्लास्टीक बॅगमध्ये टाकावा. ज्या योगे त्याची योग्य विल्हेवाट लावता येईल.

7) फुफ्फुस, हृदय, मुत्रपिंड अथवा चेतासंस्थेचे जुनाट आजार असणाऱ्या तसेच रक्ताचे विकार असणाऱ्या व्यक्ती या फ्ल्यूच्या दृष्टीने अतिजोखमीच्या गटात मोडतात, त्यामुळे असे अतिजोखमीचे आजार असणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये/कर्मचाऱ्यांमध्ये जर फ्ल्यू सदृश्य लक्षणे आढळली तर शाळा व्यवस्थापनाने त्यांना ताबडतोब वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून तपासून घेवून तातडीचे उपचार सुरू करावेत.

8) सर्व शाळा व शैक्षणिक संस्थांनी त्याच्या वर्गाची तसेच परीसराची नियमित स्वच्छता ठेवावी.

9) फ्ल्यूचा संसर्ग टाळण्यासाठी शाळा बंद ठेवण्याचा उपाय साथरोग शास्त्राच्या दृष्टीने फारसा योग्य वाटत नाही. कारण शाळांना सुट्टी दिल्यामुळे फ्ल्यू सदृश्य लक्षणे असलेली मुले समाजात वेगवेगळया ठिकाणी मिसळून फ्ल्यूचा प्रसार अधिक वेगाने होण्याची भिती असते. उलटपक्षी शाळांमध्ये शिक्षक मुलांची दैनदिंन स्वरूपात निगराणी करून फ्ल्यू सदृश्य लक्षणे असणाऱ्या मुलांना लवकर ओळखून त्यांना घरी राहण्याचा सल्ला देऊ शकतात अर्थात काही वेळा फ्ल्यूचा प्रसार अत्याधिक वेगाने होत असेल तर स्थानिक परीस्थितीनुसार शाळा व्यवस्थापन तात्पूरत्या कालावधीकरीता शाळा बंद ठेवण्याचा निर्णय घेऊ शकते.

10) एच–1, एन–1 प्रसाराबाबत काय करावे व काय करू नये या बाबतची माहिती महत्वाचे ठिकाणी लावण्यात यावी.

11) सर्व शाळांनी एच–1, एन–1 लागण झाल्यास काय करावे व काय करू नये या विषयावरील हस्तपत्रिका किंवा नेहमी विचारले जाणारे प्रश्न व त्याची उत्तरे विद्यार्थ्यांना वितरीत करावे.

12) स्थानिक आरोग्य अधिकाऱ्याचे/तज्ञांचे फ्ल्यू प्रसार रोखण्यासाठी घ्यावयाची काळजी या संदर्भातील व्याख्यान विद्यार्थी तसेच शिक्षकांसाठी आयोजित करावे.

## इन्फ्ल्युएंझा ए. एच –1 एन–1 टाळण्यासाठी हे करा

1) वारंवार साबण व स्वच्छपाण्याने हात धूवा.
2) पौष्टिक आहार घ्या.
3) लिंबू, आवळा, मोंसबी, हिरव्या पालेभाज्या यासारख्या आरोग्यदायी पदार्थांचा आहारात वापर करा.
4) धुम्रपान टाळा.
5) पुरेशी झोप आणि विश्रांती घ्या.
6) भरपूर पाणी प्या.
7) शिंकतांना, खोकतांना नाका तोंडावर रूमाल किंवा टिश्यू पेपर ठेवा.

## इन्फ्ल्युएंझा ए. एच –1 एन–1 टाळण्यासाठी हे करू नका

1) हस्तांदोलन
2) सर्वजनिक ठिकाणी थुंकू नका.
3) डॉक्टराच्या सल्ल्याशिवाय औषधे घेवू नका
4) आपल्याला फ्ल्यू सदृश्य लक्षणे असतील तर गर्दीच्या ठिकाणी जाऊ नका.

उपरोक्तप्रमाणे सुचना विद्यार्थी/पालक यांना देऊन स्वाईन फ्ल्यूचा प्रतिबंध करण्यास मदत करावी.

---

टिप :– पंचशील सिनेमा येथे रोज सकाळी 10.00 वाजता "द <u>लाईट – स्वामी विवेकानंद</u>" या चित्रपटाचा खास शो विद्यार्थ्यांसाठी आरक्षित ठेवलेला आहे. या चित्रपटात आपले आदरणीय स्वामी विवेकानंद यांच्या जीवनकार्याचा परीचय करून दिलेला आहे. हा चित्रपट उत्कृष्ठ असून महाराष्ट्र शासनाने करमुक्त केलेला आहे. शाळांनी आपल्या स्तरावर विद्यार्थ्यांच्या सुरक्षा व ने–आण करण्याची जबाबदारी घेवून हा चित्रपट दाखवावा. यामध्ये तिकीट दर फस्ट रू. 19/– रिजर्व्ह रू. 30/– बालकनी रू. 40/– व बॉक्स रू. 50/– आहे. तिकीट बुकींगकरीता व्यवस्थापक श्री. राजा लहरीया क्र. 9371278579, 9922447774 वर संपर्क साधावा.

शिक्षणाधिकारी
नागपूर महानगरपालिका, नागपूर.